*Annexure X (3), (Vide Article - 10.01)*

राज्यातील तेंदू संकलन धोरण
ठरविण्याबाबत ...

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
मंत्रालय मुंबई- ४०० ०३२
**शासन निर्णय क्रमांक एमएफपी-२१-०४/प्र.क्र.६७/फ-१**
दिनांक : १ नोव्हेंबर, २००७
**वाचा :- शासन निर्णय क्रमांक एमएफपी-२१-०४/प्र.क्र.६७/फ-१ दिनांक २८.०२.२००६.**

**शासन निर्णय :-**

राज्यात महाराष्ट्र वनोपज (व्यापार विनियमन) अधिनियम, १९६९ व त्याखालील नियमांनुसार तेंदू पानांची विल्हेवाट लावली जाते. तेंदू पाने संकलनाबाबत शेजारील राज्यांमध्ये अवलंबिण्यात येणाऱ्या पध्दती तसेच यासंदर्भात विविध स्तरावरून होणाऱ्या सूचनांच्या व मागण्यांचा सर्वंकष विचार करून शासनाने तेंदू संकलनाचे नवीन धोरणाबाबत क्रमांक एमएफपी-२१-०४/प्र.क्र.६७/फ-१, दिनांक २८ फेब्रुवारी, २००६ अन्वये निर्णय घेतला. आता या शासन निर्णया अन्वये तेंदू संकलनान्वये जमा होणा-या उत्पन्नामधून तेंदू संकलनावरील खर्च वजा जाता उर्वरित निव्वळ नफा तेंदू पाने संकलन करणा-या मजुरांना त्यांनी संकलन केलेल्या पानांच्या प्रमाणात प्रोत्साहनात्मक मजुरी म्हणून वाटप करण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी, २००६ च्या शासन निर्णयातील कार्यपध्दतीत खालील प्रमाणे बदल करुन ती अंमलात आणावी.

**१) संकलन खर्च काढण्याची पध्दत:-**

ज्या हंगामातील प्रोत्साहनार्थ मजूरी अदा करावयाची आहे त्या हंगामासाठी प्राप्त स्वामित्व शुल्कातून मागील आर्थिक वर्षात तेंदू संकलनाकरीता २४०६-वनीकरण व वन्यजीवन, १०५ वनोत्पादने, १०५ (१) (ए) शासकिय अभिकरणाकडून समुपयोजन (तेंदू) (२४०६-०४५२) या तेंदूच्या लेखाशिर्षकाअंतर्गत झालेला खर्च अधिक १२% या प्रमाणे वजा करून त्या हंगामाची प्रोत्साहनार्थ मजूरी काढण्यांत यावी.

**२) संकलनकर्त्यास द्यावयाची प्रोत्साहनार्थ मजूरी परिगणित करण्याचे सुत्र:-**

(i) राज्यस्तरावर प्राप्त होणा-या एकुण स्वामित्व शुल्कातून तेंदू संकलनावर वर प्रमाणे नमूद खर्च वजा करून उर्वरित निव्वळ स्वामित्व शुल्क प्रोत्साहनार्थ मजूरी वाटपासाठी राज्यासाठी उपलब्ध समजावे.

(ii) राज्यस्तरावर निव्वळ स्वामित्व शुल्काची एकुण स्वामित्व शुल्काशी जी टक्केवारी येईल त्या टक्केवारीनुसार प्रत्येक घटक/ घटक समूहाकरीता प्रोत्साहनार्थ मजूरीची रक्कम ठरविण्यांत यावी.

(iii) घटक/ घटक समूहाच्या वरील पध्दतीने काढलेल्या प्रोत्साहनार्थ मजूरीला त्या घटका/ घटक समूहातून एकुण प्रत्यक्षात संकलन केलेल्या प्रमाण गोणीने भागुन प्रोत्साहनार्थ मजूरीचा त्या धटक/ घटक समूहाकरीता प्रति प्रमाण गोणी दर काढण्यांत यावा आणि त्या घटक/ घटक समूहातील प्रत्येक तेंदू संकलनकर्त्यांसाठी या दराचा वापर करून त्यांनी संकलीत केलेल्या प्रमाण

गोणीस गुणुन येणारी रक्कम प्रोत्साहनार्थ मजूरी म्हणून त्या संकलनकर्त्यास वाटप करण्यांत यावी.

**३) तेंदू संकलनाकरीता झालेला खर्च योग्य लेखाशिर्षात भरपाई (Recoup) करणे बाबत:-**

स्विय प्रपंची लेख्यात जमा करण्यांत आलेल्या एकुण स्वामित्व शुल्कातून तेंदू संकलनकर्त्यास द्यावयाच्या प्रोत्साहनार्थ मजूरीची रक्कम वजा करून उर्वरित स्वामित्व शुल्काची रक्कम महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ अन्वये विहीत फॉर्म एमटीआर-६ चा वापर करून खालील लेखा शिर्षात महसूल म्हणून जमा करावी.

| | |
|---|---|
| प्रधान लेखा शिर्ष :- | ०४०६ वनीकरण व वन्यजीवन (महसूली जमा) |
| गौण शिर्ष :- | १०१ इमारती लाकूड व इतर गौण वनोत्पादने यांची विक्री |
| उप शिर्ष :- | (एक) संस्करण पथकाखेरीज अन्य शासकिय अभिकरणाकडून समुपयोजन (०४०६ ००११) तेंदूपाने रॉयल्टी |

**४) तेंदू संकलनाप्रित्यर्थ लागणा-या खर्चाबाबत :-**

तेंदू संकलनाकरीता लागणा-या सर्व प्रकारच्या खर्चासाठी उदा. वेतन, मजूरी, कार्यालयीन खर्च, प्रवास खर्च, पेट्रोल/ तेल/ वंगण, भाडेपट्टी/ कर, जाहिरात, साहित्य पुरवठा, प्रोत्साहनार्थ मजूरी वाटप समारंभ, विमा योजना प्रिमियम, आकस्मीक खर्च इत्यादीसाठी लागणारे अनुदान प्रचलित पध्दतीनुसार २४०६-वनीकरण व वन्यजीवन, १०५ वनोत्पादने, १०५ (१) (ए) शासकिय अभिकरणाकडून समुपयोजन (तेंदू) (२४०६-०४५२) या शिर्षकाखाली मागणी करण्यांत यावे आणि प्राप्त अनुदानातुनच तेंदू संकलनाच्या खर्चाच्या मंजूर बाबीवर प्रचलीत पध्दतीनुसार खर्च करावा. तेंदू संकलनाकरीता लागणारा खर्च स्वीय प्रपंची लेख्यातुन करू नये.

**(५) रु. ५००/- पर्यंतची प्रोत्साहनात्मक रक्कम रोखीने वाटप करण्यात यावी व रु ५००/- पैक्षा अधिक प्रोत्साहनात्मक मजूरी धनादेशाद्वारे देण्यात यावी**

**(६) गटविमा योजने ऐवजी केंद्र शासनाची ' आम आदमी विमा योजना ' लागू करण्यात यावी.**

**(७) शासन निर्णय दिनांक २८.२.२००६ मधील स्वीय प्रपंची लेखा बाबतचे प्रस्ताव या शिर्षकांतर्गत असलेल्या परिच्छेदात खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.**

७.१ उपरोक्त शिर्षकांतर्गत असलेल्या परिच्छेदातील परिच्छेद (१) मध्ये महाराष्ट्र कोषागार नियम भाग-१, १९६८ या वाक्यातील भाग-१ हा शब्द वगळण्यात येत आहे.

७.२ वर उल्लेखित शिर्षकांतर्गत असलेल्या (अ) वरील परिच्छेदातील वाक्यातील भाग-१ या शब्दाऐवजी भाग-९ असा बदल करण्यात येत आहे.

७.३ वर उल्लेखित शिर्षकांतर्गत असलेल्या (ब) वरील परिच्छेदातील वाक्यातील भाग-१ या शब्दाऐवजी भाग-३ असा बदल करण्यात येत आहे तसेच भाग-२ हा शब्द वगळण्यात येत आहे.

७.४ वर उल्लेखित शिर्षकांतर्गत असलेल्या (क) वरील परिच्छेदात खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

ज्यांचे नावे स्वीय प्रपंची लेखा आहे, त्यांचे नांवे धनादेश पुस्तक संबंधित कोषागार अधिकारी यांचेकडून प्राप्त करून घेण्यांत यावे व त्यातून प्रोत्साहनार्थ मजूरी चे वाटप संबंधित मजूरांना धनादेशाद्वारे करण्यात यावी वा रोख रकमेने करण्याकरिता सबंधित वन परिक्षेत्र अधिकारी याना धनादेश देण्यांत यावेत." प्रोत्साहनार्थ मजूरी ही बाब वगळता तेंदू संकलनाच्या कुठल्याही प्रकारच्या खर्चाकरिता उक्त स्वीय प्रपंची लेखा आणि त्या अंतर्गत प्राप्त करून घेतलेले धनादेश पुस्तक यांचा वापर करू नये

गावातील किंवा गाव समुहातील तेंदू पाने संकलन करणा-या लोकांना प्रोत्साहनात्मक रक्कम सोयीस्कर ठिकाणी जाहीररित्या समारंभपूर्वक देण्यात यावी.

सन २००७ च्या तेंदू हंगामातील प्रोत्साहनात्मक रकमेच्या वाटपाकरिता या शासन निर्णयानुसार २००६ च्या हंगामाच्या प्रोत्साहनात्मक रकमेचे वाटप झाल्यावर प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ प्र.क्र. २५०/०७/व्यय-१० दिनांक ३.९.२००७ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( राजेंद्र मंगरुळकर )
सह सचिव
महसूल व वन विभाग.

प्रति,

मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री/ राज्यमंत्री , महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, वित्त, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, नियोजन, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई.
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ (म.), नागपूर.
सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक / सर्व मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) वन वृत्ते.

cabinet note Tendu-2007C:\Documents and Settings\bp230855\Desktop cabinet note Tendu-2007

मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुंबई / नागपूर,
सर्व वनसंरक्षक (वन्यजीव).
वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प, मेळघाट, अमरावती/पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर/ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
सर्व वनसंरक्षक (प्रादेशिक) वन वृत्ते.
सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ (म.)
सर्व उपवनसंरक्षक (प्रादेशिक वन विभाग),
सर्व उपवनसंरक्षक (वन्यजीव),
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
महालेखापाल-१ व २ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
वित्त विभाग (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई.
वन कक्षातील सर्व सह सचिव आणि उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
वन कक्षातील सर्व कार्यासने व ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, (निवडनस्ती).

-----